दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ रविवार, दि. ०२ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १०३ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## राज्यांना 1 लाख हजार कोटींचे कर वितरण

नवी दिल्ली : राज्यांच्या वित्तीय व्यवस्थेला बळकटी देत विकासकामांना अधिक गती मिळावी, या उद्देशाने केंद्र सरकारने आज सर्व राज्यांना १ लाख ९ हजार कोटी रुपयांच्या कर वितरणाची अतिरिक्त अग्रीम हप्ता विपरीत केला आहे.राज्यनिहाय वाटपानुसार, महाराष्ट्राला ७ हजार २२ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी प्राप्त झाला आहे. केंद्र शासनाने ही रक्कम १० ऑगस्ट रोजी होणाऱ्या नियमित मासिक कर हस्तांतरणाव्यतिरिक्त वितरित केली आहे.

## अयोध्येच्या मेडिकल कॉलेजमध्ये सापडला बॉम्ब बनवण्याचा आराखडा

**अयोध्या :** उत्तर प्रदेशातील अयोध्या येथील राजर्षी दशरथ मेडिकल कॉलेजमध्ये शनिवारी सकाळी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला. महाविद्यालयाच्या एक्स-रे विभागातील ड्रॉवरमध्ये बॉम्ब बनवण्याची कथित पद्धत लिहिलेला संशयास्पद कागद आढळून आला. ही बाब समोर येताच कॉलेज प्रशासनाने तात्काळ पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दस्तऐवज जप्त केला असून या प्रकरणी तीन विद्यार्थ्यांना ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे.

## थोडक्यात वार्ता

### अशोक खरात शिर्डी पोलिसांच्या ताब्यात आणून चौकशी सुरू

**शिर्डी ( प्रतिनिधी) :** राहाता येथील समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या शाखेत बोगस खाती उघडून आर्थिक व्यवहार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल असलेला आरोपी अशोक खरात याला शिर्डी पोलिसांनी नाशिक मध्यवर्ती कारागृहातून ताब्यात घेतले आहे. न्यायालयाची परवानगी घेतल्यानंतर त्याला पुढील तपासासाठी शिर्डी पोलीस ठाण्यात आणण्यात आले असून, त्याची सखोल चौकशी सुरू आहे. समता पतसंस्थेच्या राहाता शाखेत बनावट कागदपत्रांच्या आधारे काही व्यक्तींच्या नावाने खाती उघडण्यात आल्याचा आरोप आहे. या खात्यांमधून मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झाल्याची बाब तपासात समोर आल्यानंतर शिर्डी पोलिसांनी अशोक खरात व संबंधित शाखा व्यवस्थापकासह अन्य संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. तपासादरम्यान अनेक खातेदारांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. काहींनी आपल्या नावाने खाते उघडल्याची माहिती नसल्याचे सांगितले असून, त्याआधारे पोलिसांकडून कागदपत्रे, केवायसी प्रक्रिया आणि व्यवहारांची पडताळणी केली जात आहे. अशोक खरात याला ताब्यात घेतल्यानंतर या प्रकरणातील आर्थिक व्यवहारांचे नेमके स्वरूप, बोगस खाती उघडण्यामागील सूत्रधार, व्यवहारात सहभागी असलेले इतर संशयित तसेच पतसंस्थेतील अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची भूमिका याबाबत चौकशी केली जाणार आहे. या चौकशीतून समता पतसंस्था प्रकरणातील आणखी महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे.

### 'एका धुरंधराला पुरस्कार देण्यासाठी दुसरे धुरंधर आले' : मुख्यमंत्री फडणवीस

**पुणे :** लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांचे भरभरून कौतुक करत केलेले भाषण विशेष चर्चेचा विषय ठरले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठात झालेल्या या कार्यक्रमात अमित शाह यांच्या हस्ते अजित डोवाल यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना फडणवीस म्हणाले, "आजचा दिवस अत्यंत आनंदाचा आहे. राष्ट्रीय सुरक्षेला नवी दिशा देणारे अजित डोवाल यांना सन्मानित करण्यासाठी राजकारणातील धुरंधर अमित शाह उपस्थित आहेत. एका धुरंधराला पुरस्कार देण्यासाठी दुसरे धुरंधर आले आहेत."

**अमित शाहांना दिली 'राजकारणातील चाणक्य'ची उपमा :** फडणवीसांनी आपल्या भाषणात अमित शाह यांना "राजकारणातील चाणक्य", तर अजित डोवाल यांना "राष्ट्रीय सुरक्षेचे चाणक्य" अशी उपमा दिली. त्यांनी सांगितले की, २०१४ नंतर देशाच्या सुरक्षा व्यवस्थेत मोठे बदल झाले असून, भारताची भूमिका आता केवळ बचावाची नसून आवश्यकतेनुसार ठोस प्रत्युत्तर देणाऱ्या राष्ट्राची झाली आहे. लोकमान्य टिळकांचा उल्लेख करताना फडणवीस म्हणाले की, "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच," हा संदेश देत टिळकांनी राष्ट्रवादाची ज्योत प्रज्वलित केली. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणत त्यांनी स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा दिली. अशा राष्ट्रवादी विचारांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार अजित डोवाल यांना मिळणे हा अभिमानाचा क्षण असल्याचे त्यांनी सांगितले.आपल्या भाषणाच्या शेवटी फडणवीस म्हणाले, "अजित डोवाल यांना शंभर वर्षांपर्यंत देशसेवा करण्याची शक्ती लाभो, अशी मी प्रार्थना करतो. राष्ट्रप्रेम, त्याग आणि देशभक्तीचे प्रतीक असलेल्या व्यक्तीला हा पुरस्कार मिळणे ही सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे."

## भाजप आमदार अनुराधा चव्हाण यांचे पती अतुल चव्हाण यांचा बांधकाम मुख्य अभियंता पदाचा राजीनामा!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राजकीय वर्तुळ आणि प्रशासकीय सेवेतील सीमारेषेबाबत नेहमीच चर्चा होत असते. मात्र, जेव्हा एखाद्या वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याचे नाव थेट राजकीय मंचाशी जोडले जाते, तेव्हा प्रशासकीय व कायदेशीर वाद निर्माण होतात. याच पार्श्वभूमीवर आता छत्रपती संभाजीनगरमधून एक महत्त्वाची बातमी समोर आली असून, फुलंब्री मतदारसंघाच्या भाजप आमदार अनुराधा चव्हाण यांचे पती तथा सार्वजनिक बांधकाम विभागाचे (पीडब्ल्यूडी)



मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

काही महिन्यांपूर्वी भाजप कार्यकर्त्यांनी लावलेल्या विविध राजकीय होर्डिंग्ज आणि बॅनरवर आमदार अनुराधा चव्हाण यांच्यासह त्यांचे पती अतुल चव्हाण यांचे फोटो मोठे झळकले होते. एका उच्च पदस्थ सरकारी अधिकाऱ्याचा फोटो थेट राजकीय पक्षाच्या जाहिरातीत कसा वापरला जाऊ शकतो, असा गंभीर प्रश्न उपस्थित करत माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे रीतसर तक्रार दाखल केली होती. या वाढत्या दबावामुळे आणि प्रशासकीय कारकिर्दीवरील संकटाची शक्यता लक्षात घेऊन, अतुल चव्हाण यांनी त्यावेळी आपल्या आमदार पत्नीला पत्र पाठवून पक्षाच्या बॅनरवर किंवा जाहिरातीवर आपले फोटो छापू नयेत, अशा स्पष्ट सूचना दिल्या होत्या. राजकीय बॅनरबाजीमुळे आपल्या प्रशासकीय कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहत असल्याचे त्यांनी या पत्रात म्हटले होते.

प्रशासकीय सेवेत कार्यरत असताना राजकीय तटस्थता आणि शिस्त राखणे हे प्रत्येक अधिकाऱ्याचे आद्य कर्तव्य असते. कुटुंबातील एखादा सदस्य राजकारणात असला तरीही, अधिकाऱ्यांनी प्रशासकीय नियमांच्या चौकटीत राहूनच आपली जबाबदारी पार पाडणे अपेक्षित असते. अतुल चव्हाण यांच्या राजीनाम्याच्या निर्णयामुळे प्रशासकीय नियम, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि राजकीय महत्त्वाकांक्षा यांची गुंतागुंत पुन्हा एकदा ऐरणीवर आली असून, भविष्यात ते राजकीय क्षेत्रात कोणती भूमिका घेतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### राजीनाम्यामागील संभाव्य कारणे

**दगडूजी आणि दुरुस्तीसाठी घाटी रुग्णालयाला दोन वर्षांपूर्वी मिळालेले 14 कोटी चा भ्रष्टाचाराचा त्यांच्यावर होणारा आरोप प्रत्यारोप हे मुख्य कारण असण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे. सरकारी नोकरी आणि कुटुंबातील राजकीय वारसा यातील संघर्ष टाळण्यासाठी त्यांनी हे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे. प्रशासकीय जबाबदारी आणि पत्नीची राजकीय वाटचाल यांचा समतोल राखणे कठीण झाल्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतल्याचा अंदाज वर्तवला जात असून, या राजीनाम्यानंतर ते पूर्णवेळ राजकारणात सक्रिय होणार का, याबद्दल राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.**

## नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'अल्लुरी सीताराम राजू आंतरराष्ट्रीय विमानतळा'चे उद्घाटन

### ₹17,900 कोटींच्या विकासकामांचे लोकार्पण!

**विझियानगरम :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी आंध्र प्रदेशातील भोंगापुरम (विझियानगरम) येथे नव्याने उभारण्यात आलेल्या 'अल्लुरी सीताराम राजू आंतरराष्ट्रीय विमानतळाचे' भव्य उद्घाटन करण्यात आले. या ऐतिहासिक सोहळ्यानंतर पंतप्रधान मोदी तब्बल १७,९०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध महत्त्वाकांक्षी विकास प्रकल्पांचे देशाला लोकार्पण करणार आहेत.

आज सकाळी पंतप्रधान मोदींचे भोंगापुरम येथे आगमन होताच त्यांचे अत्यंत उत्साहात स्वागत करण्यात आले. या सोहळ्याला आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आणि उपमुख्यमंत्री पवन कल्याण हे प्रमुख नेते विशेषत्वाने उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर पंतप्रधान मोदी कर्नाटकातील म्हैसूर येथे रवाना होणार असून, दुपारी ३.३० वाजता श्री रामकृष्ण आश्रमातील 'स्वामी विवेकानंद सांस्कृतिक युवा केंद्र - विवेक स्मारक'चे उद्घाटन करून उपस्थितांना संबोधित करतील.

**₹५,६४० कोटींचा प्रकल्प; वर्षाला ६० लाख प्रवाशांची क्षमता! :** पंतप्रधान कार्यालयाने (PMO) दिलेल्या माहितीनुसार, हा ग्रीनफिल्ड विमानतळ 'पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिप' (PPP) मॉडेलअंतर्गत ५,६४० कोटी रुपयांहून अधिक खर्च करून उभारण्यात आला आहे. या विमानतळाची क्षमता वार्षिक तब्बल ६० लाख प्रवाशांना सेवा देण्याची आहे. प्रवाशांचा प्रवास अत्यंत सोपा, सुखकर आणि आधुनिक व्हावा, अशा पद्धतीने याच्या पॅसेंजर टर्मिनलची रचना करण्यात आली आहे.

**कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर :** या विमानतळावर प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि सोयीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ऑटोमेटेड बॅगेज हँडलिंग सिस्टम (सामान वाहून नेणारी यंत्रणा), बायोमेट्रिक एंट्री आणि स्मार्ट मॉनिटरिंग यांसारख्या हाय-टेक सिस्टीमचा समावेश आहे. यामुळे विमानतळाचे काम वेगाने होईल आणि प्रवाशांचा वेळ वाचेल.

**पर्यावरणपूरक आणि 'ग्रीन बिल्डिंग' डिझाईन :** हा विमानतळ केवळ आधुनिकच नाही तर पूर्णपणे पर्यावरणपूरक आहे. येथे ५ मेगावॅटचा सौर ऊर्जा (Solar) प्रकल्प, पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था आणि ई-व्ही (EV) चार्जिंग स्टेशन उभारण्यात आले आहेत. अमेरिकेच्या 'युएस ग्रीन बिल्डिंग कौन्सिल'च्या (USGBC) मानकांनुसार या टर्मिनलची रचना करण्यात आली आहे.

आंध्र प्रदेशच्या संस्कृतीची झलक

विमानतळाची वास्तुकला आंध्र प्रदेशच्या समृद्ध संस्कृतीतून प्रेरित आहे. टर्मिनलच्या छताची रचना तिथल्या पारंपारिक 'चुट्टीलू' झोपड्या आणि सुंदर 'अराकू व्हॅली'च्या निसर्गरम्य दृश्यांवर आधारित आहे. तसेच, याचा प्रवाही आकार उडणाऱ्या माशाच्या हालचालींसारखा दिसतो, ज्यामुळे आधुनिकतेत स्थानिक संस्कृतीचा सुरेख संगम पाहायला मिळतो.

## 'अँम्ब्युलन्स' सेवांच्या मनमानी भाडेवसुलीला लगाम

### राज्यात नवे धोरण येणार

**मुंबई :** राज्यातील रुग्णवाहिका (अँम्ब्युलन्स) सेवा अधिक सक्षम, सुरक्षित, पारदर्शक आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्यासाठी मोटार वाहन विभागामार्फत लवकरच सर्वसमावेशक 'महाराष्ट्र राज्य रुग्णवाहिका धोरण' आखण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शनिवारी दिली. या नव्या धोरणामुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत आणि रास्त दरात सेवा मिळणे शक्य होणार असून, प्रत्येक रुग्णवाहिकेवर शासनाची डिजिटल नजर असणार आहे.

सध्या राज्यात १०८ सेवा आणि खासगी, धर्मादाय संस्थांच्या मिळून सुमारे ५ हजार ५०० रुग्णवाहिका कार्यरत आहेत. मात्र, त्यांची उपलब्धता, दरपत्रक आणि प्रतिसादाचा वेळ याबाबत कोणतीही एकसंध यंत्रणा अस्तित्वात नाही. हीच उणीव दूर करण्यासाठी या धोरणांतर्गत चार स्वतंत्र डिजिटल ॲप्लिकेशन्स एकमेकांशी जोडली जाणार आहेत. यामुळे नागरिकांना जवळची रुग्णवाहिका शोधणे, तिचे स्थान (लाइव्ह लोकेशन), अंदाजित भाडे आणि पोहोचण्याची अचूक वेळ समजणे सुलभ होणार आहे. तसेच रुग्णवाहिकेतील उपकरणांची स्थिती आणि




चालकाची कामगिरी आरटीओ व आरोग्य विभागाच्या डॅशबोर्डवर दिसणार आहे.

'एआयएस-१२५' वर्गवारीनुसार कमाल दर अधिसूचित केले जातील. प्रत्येक फेरीत डिजिटल पावती देणे आणि ॲपवर दरपत्रक प्रसिद्ध करणे बंधनकारक असणार आहे. याशिवाय, अपघाताच्या वेळी सामान्य नागरिकांना प्राथमिक उपचारांचे (सीपीआर, रक्तस्राव रोखणे) सचित्र मार्गदर्शन डिजिटल प्रणालीद्वारे दिले जाईल.

तंत्रज्ञान, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाचा मेळ घालून राज्यातील प्रत्येक नागरिकाला आपत्कालीन परिस्थितीत विश्वासार्ह सेवा पुरवणे हा या धोरणाचा मुख्य उद्देश असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

## घरकुल ची फाईल मंजूर करण्यासाठी दहा हजाराची लाच घेताना पकडले

### गंगाखेड न.प.तील बाहेर स्तोत्र कर्मचारी लाचलुचपत पथकाच्या जाळ्यात

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :-** प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंतर्गत घरकुल मंजूर करण्याकरिता दहा हजाराची लास स्वीकारताना गंगाखेड नगरपरिषदेत बाहेर असतो तर कर्मचारी परभणी लाचलुचपत प्रतिबंधक पथकाच्या विभागाच्या जाळ्यात अडकला असून दिनांक 31 जुलै रोजी शुक्रवार रोजी गंगाखेड शहरातील



हॉटेलमध्ये सदर लाचखोल कर्मचाऱ्यावर गंगाखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला अधिक माहिती अशी की गंगाखेड नगर परिषदेतील बाह्य स्तोत्र विभागातील कर्मचारी सय्यद अजमत सय्यद नियामत असे लाच घेणाऱ्या कर्मचाऱ्याचे नाव असून परभणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे 28 जुलै रोजी तक्रारदाराने तक्रार दिली होती सासूच्या प्लॉटवर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर करून घेण्याकरिता नगरपरिषद गंगाखेड येथे प्रस्ताव दिला होता हा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी बाह्य स्तोत्र कर्मचारी सय्यद अजमत यांनी लाच मागितल्यानंतर पडताळणी केल्यानंतर कर्मचाऱ्यांनी तक्रार ला पंचायत समक्ष एक लाख रुपये याची मागणी केली सुरुवातीला दहा हजार रुपये रक्कम लाच मान्य केले ही रक्कम स्वीकारताना संबंधित कर्मचाऱ्यावर सापळा लावण्यात आला ही कारवाई पोलीस उपाधीक्षक महेश पाटणकर पोलीस उपनिरीक्षक नील पत्रेवार पोलीस अंमलदार आदमे नागरगोजे कदम घुले नरवाडे यांच्या पथकाने केली.

## दुचाकी व चार चाकीच्या धडकेत एकाचा जागीच मृत्यू

### चुडावा पोलिसात गुन्हा दाखल; गौर शिवारातील नांदेड पूर्णा रोडवरील घटना

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :-** बुलेट नावाच्या दुचाकीवरून जाणाऱ्या एका 28 वर्षीय तरुणाला भरधाव वेगाने चार चाकी वाहनाने जबरदस्त धडक देऊन फरपटत नेल्याचे घटनापूर्णा नांदेड रोड गौर शिवारात 31 जुलै शुक्रवार रोजी सकाळी च्या सुमारास घडली चुडावा पोलिसानी एका व्यक्तिस ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे चुडावा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे मयत संतोष बालाजी सावळे वय 28 वर्षे राहणार गोर तालुका पूर्णा जिल्हा परभणी असे घटनेत मृत्यू पावलेल्या तरुणाचे नाव असून तरुण हा 31 जुलै रोजी शुक्रवारी सकाळी दहा पंचेचाळीस वाजताच्या सुमारास बुलेट नावाच्या दुचाकीवरून एम एच 22 11 13 दुचाकीवरून पुरणेच्या दिशेने जात असताना पूर्णा नांदेड रस्त्यावरील नोवेल्टी बार अँड रेस्टॉरंट च्या जवळ विना नंबरच्या काळा रंगाच्या धार नावाच्या चार चाकी वाहनाने त्यांच्या बुलेट



ला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने या धडकेत संतोष रक्ताच्या थारोळ्यात पडला होता काही नागरिकांनी त्याला उचलून नांदेड उपचार नांदेड येथे उपचारासाठी हलवले परंतु तो मयत असल्याचे निष्पन्न झाले दरम्यान घटनास्थळी बघ यांची फार मोठी गर्दी जमली होती घटनेची माहिती मिळताच जिल्हा अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले उपविभागीय पोलीस अधिकारी कुंदन वाघमारे साहेब पोलीस निरीक्षक सुशांत केनगे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी धाव घेऊन पाहणी केली दरम्यान याचवेळी सोळावा पोलीस ठाण्यातील कर्तव्यावर असलेले पोलीस कॉन्स्टेबल पूर्ण नांदेड रस्त्यावरून चुडावाकडे जात असताना त्यांनी हा प्रकार पाहताच संबंधित वाहनाला थांबवण्याचा प्रयत्न केला परंतु वाहनातील दोघेजण वाहन सोडून पळून जात होते त्यापैकी सुधीर पारवे नामक एका इसमाला हनवते यांनी पाठलाग करून ताब्यात घेत जेर बंद केले याच दरम्यान मयत तरुणांच्या नातेवाईकांनी म्हणण्यानुसार संतोष सावळे यांचे काही महिन्यापूर्वी गावातील काही तरुणाची हाणामारी झाल्याचे त्यांनी सांगितले या घटनेचा गुन्हा दाखल केल्याचा राग मनात धरून काही जणांनी संतोष यास वाहनाने चिडून जीव मारण्याचा कट रचण्याचा कारणावरून चुडावा पोलिसात 14 जनाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस ठाणे अंमलदार करत आहेत .

## "शाल जोडे"




## सहायक पोलिस आयुक्त अशोक राजपूत निवृत्त

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शहर गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त अशोक लालसिंग राजपूत पोलिस दलातील प्रदीर्घ सेवेतून शुक्रवारी, ३१ जुलै रोजी निवृत्त झाले आहेत. पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांच्यासह आयुक्तालयातील गुन्हे शाखेसह विविध शाखांचे प्रभारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कारकीर्दीतील आठवणींना उजाळा देत भावपूर्ण निरोप देण्यात आला.

अशोक राजपूत मूळचे जळगाव जिल्ह्यातील शिंदी (ता. भुसावळ) येथील आहेत. १९९२ मध्ये पोलीस उपनिरीक्षक म्हणून

एमपीएससीमार्फत निवड झाली. नाशिकमधील महाराष्ट्र पोलिस अकॅडमीत प्रशिक्षण पूर्ण करून प्रथम नियुक्ती नागपूर येथे झाली. त्यानंतर औरंगाबादेत पोलीस आयुक्तालय,अँटी करप्शन विभाग, नगर जिल्ह्यात एमआयडीसी व राहुरी पोलिस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख म्हणून सात वर्षे काम



यशस्वीपणे काम पाहिले. २०१० मध्ये त्यांना राज्याचे पोलीस महासंचालक यांच्याकडून उत्कृष्ट सेवा प्रदान केली म्हणून सन्मानचिन्ह मिळाले. नंतर सीआयडी विभाग,औरंगाबाद,त्यानंतर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात गुन्हे शाखा, नेरूळ पोलीस ठाणे, पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे त्यांनी धडाकेबाज कामगिरी केली. त्यानंतर चाकण पोलिस ठाण्यातही उल्लेखनीय कामगिरी केली. १९९२ पासून आतापर्यंत अवैध दारू विक्री करणारे गुन्हेगारांसह अमली पदार्थ विकणाऱ्या टोळ्या, अवैध शस्त्र विक्री करणारे व शस्त्रे बाळगणाऱ्या टोळ्यांना जेरबंद करून अनेक गुन्हे उघडकीस आणले. जबरी चोरी, घरफोडी, वाहन चोरी, मंगळसूत्र चोरणाऱ्या टोळ्या, दरोडेखोरांच्या टोळ्या गजाआड करून अनेक गंभीर गुन्हे उघडकीस आणून अनेक गुन्ह्यांत त्यांना शिक्षा झालेली आहे. खुनाचे देखील अनेक संवेदशील गुन्हे मोठ्या शिताफीने उघडकीस आणण्यात त्यांना यश आले असून, अनेक गुन्ह्यांत आरोपींना जन्मठेपेची शिक्षा झालेली आहे. उत्कृष्ट कामगिरीमुळे २००८ मध्ये पोलीस निरीक्षक म्हणून पदोन्नती झाली. डिसेंबर २०२१ मध्ये पोलीस उपाधीक्षक/ सहाय्यक पोलिस आयुक्त म्हणून पदोन्नती मिळाली. सध्या राजपूत सहाय्यक पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेतून निवृत्त झाले.

शेकडो बक्षिसांसह प्रशंसापत्रे

उत्कृष्ट कामगिरीमुळे त्यांना वरिष्ठांकडून ७०० बक्षिसे व १४० प्रशंसापत्रे मिळाली आहेत. याशिवाय १३ ऑक्टोबर २२ मध्ये राष्ट्रपतींचे 'सरहानिय सेवा मेडल' मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पोलीस महासंचालक रजनीश सेठ व संजय कुमार तसेच महाराष्ट्र राज्यासह भारतीय पोलीस सेवेतील अन्य वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत राजभवन येथे प्रदान करण्यात आले आहे.

## शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थान येथे श्री गुरुपौर्णिमा उत्सवामध्ये 07 कोटी 81 लाख 13 हजार 377 इतकी देणगी प्राप्त

**शिर्डी :** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने बुधवार दि. २८ जुलै २०२६ ते शुक्रवार दि. ३० जुलै २०२६ या कालावधीत आयोजित केलेल्या श्री गुरूपौर्णिमा उत्सवामध्ये रुपये ०७ कोटी ८१ लाख १३ हजार ३७७ इतकी देणगी प्राप्त झाली असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली. सदर देणगी मध्ये रोख स्वरुपात रुपये ०२ कोटी ०४ लाख ३५ हजार ५५७ दक्षिणा पेटीत प्राप्त झाली असून, देणगी काऊंटरवर ०१ कोटी २५ लाख ४७ हजार ९३५ रुपये, पी.आर.ओ.देणगी ८७ लाख १४ हजार, डेबीट क्रेडीट कार्ड,ऑनलाईन देणगी, चेक डी.डी.देणगी, मनी ऑर्डर असे एकूण ०२ कोटी ०७ लाख ८४ हजार ७०१ रुपये, परकीय चलनाद्वारे ०५ लाख ६५ हजार ९९१ रुपये, सोने १,१२५.५७० ग्रॅम प्राप्त झाले असून त्याचे मुल्य रक्कम रुपये ०१ कोटी ४६ लाख ७४ हजार ५४४ व चांदी २,३७६.५०० ग्रॅम प्राप्त झाली असून तीचे मुल्य रक्कम रुपये ०३ लाख, ९० हजार ६४९ असे आहे. श्री गुरूपौर्णिमा उत्सव कालावधीत साधारणतः ०३ लाखाहून अधिक साईभक्तांनी साईदर्शनाचा लाभ घेतला. उत्सव कालावधीमध्ये श्री साईप्रसादालयाद्वारे सुमारे ०१ लाख ९४ हजार २८५ साईभक्तांनी प्रसाद भोजनाचा तर ३९,६११ अन्नप्रसाद पाकिटांचा लाभ घेतला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना विविध पक्ष, संस्था, संघटनांकडून अभिवादन

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध पक्ष, संस्था, संघटनांकडून अभिवादन करण्यात आले. जिल्हा उत्सव समितीच्या वतीने जटवाडा रोड येथील अंबर व्हील परिसरात त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी महापुरुषांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. ढोल-ताशांच्या गजरात आणि उत्साहपूर्ण वातावरणात जयंती सोहळा जल्लोषात पार पडला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव केला. शोषित आणि कष्टकरी समाजाच्या वेदना त्यांनी आपल्या ओजस्वी लेखणीतून जगासमोर मांडल्या. सामाजिक न्याय, समता आणि मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारे त्यांचे साहित्य आजही समाजाला प्रेरणादायी आहे. त्यांचे साहित्य हे सामाजिक प्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे, असे मत मान्यवरांनी मांडले.

जिल्हा उत्सव समितीचे अध्यक्ष किशोर दणके, स्वागताध्यक्ष विलास खोतकर, सचिव डॉ. नागेश गायकवाड, सहसचिव विशाल भालेराव, सल्लागार प्रा. बी. डी. खोतकर, संजय कसारे, राजू आहिरे, संजय साठे, किशोर तुपे, ज्ञानेश्वर निकाळजे, अजय जाधव, ओहरचे सरपंच व सदस्य, महिला आघाडीच्या निता कांबळे, पुष्पा भालेराव, वैशाली पाचवणे आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन वंदन कसारे यांनी, तर आभार दणके यांनी मानले.

जिल्हा कॉंग्रेस कमिटी

आपल्या साहित्यातून उपेक्षित, वंचित व कष्टकरी समाजाच्या वेदनांना वाचा फोडून समतेचा संदेश देणारे अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शहर व जिल्हा कॉंग्रेस कमिटीतर्फे खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व जिल्हाध्यक्ष ॲड. सय्यद अक्रम यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालया जवळील अण्णा भाऊ साठे चौक, नेहरू बाल उद्यान येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी अशोक डोळस, भाऊसाहेब जगताप, मोहम्मद जाकेर, रामभाऊ लोखंडे, महेंद्र रमंडवाल, मतीन अहमद, इंजि. विशाल बन्सवाल, मोईन कुरेशी, योगेश थोरात, शेख अब्दुल रईस, कल्याण चव्हाण, असदउल्ला शकील, अनिल पारखे, शफिक शहा, चंद्रकांत बनसोडे, जयपाल दवणे, सुनील साळवे, मुनीर पटेल, मयूर गायकवाड, नितेश सूर्यतळे, उत्तम दणके, यादव अहिरे उपस्थित होते.

* दलित पँथर

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पँथर नेते लक्ष्मण भुतकर, धम्मपाल दांडगे यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. त्यावेळी अण्णा भाऊंच्या जीवन कार्यावर पँथर नेते लक्ष्मण भुतकर यांनी प्रकाश टाकला. उपवर्गीकरण हे दोन्ही समाजाच्या विकासाला बाधा पोहोचवणारे असून समाज हितासाठी एक व्हा असे आवाहन केले. यावेळी राजकुमार कांबळे, दशरथ कांबळे, संजय सरोदे, गौतम पगारे, उत्तम डोंगरे, मधुकर आराख, पांडुरंग जाधव, किसन भिवसने, शाहीर निकाळजे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

* रिपाइंतर्फे अभिवादन

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले) वतीने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पक्षाचे राज्य कार्याध्यक्ष बाबूराव कदम, राज्य उपाध्यक्ष दौलत खरात, सदस्य किशोर थोरात, जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण इंगळे यांची उपस्थिती होती. यावेळी अण्णा भाऊ यांच्या साहित्याचा व क्रांतीकारी विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त करण्यातआला. याप्रसंगी दिलीप पाडमुख, प्रशांत वाकळे, बाळासाहेब नरवडे, कृष्णा वाहुळ, विकास राऊत, पंकज अंभोरे आदी उपस्थित होते.

आंबेडकरवादी संघर्ष समिती

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील पुतळ्यास समिती अध्यक्ष श्रावण गायकवाड यांच्यासह उपस्थित कार्यकर्त्यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी प्रा.अरुण कांबळे, कैलास सराटे, किशोर गडकर, कांचन सदाशिवे, विश्वनाथ दांडगे, महादेव डांबरे, अशोक सोनवणे, रोहिदास गोरमे, विलास गोरे, सोमनाथ वाघमारे, कैलास काळे, रामेश्वर घिटरे आदी उपस्थित होते.

* वंचित आघाडी

वंचित बहुजन आघाडी छत्रपती संभाजी नगर पश्चिमतर्फे अण्णा भाऊ साठे यांना जिल्हाध्यक्ष रुपचंद गाडेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नगरसेवक अफसर खान, प्रभाग एकच्या सभापती करुणा जाधव, प्रवीण हिवाळे, मेघानंद जाधव, राजन किर्तने, मेश सरदार, भगवान खिल्लारे, आनंद शेजुळ, इजि. इक्बाल, एस. पी. हिवराळे उपस्थित होते.

* सामाजिक समता संघ

सामाजिक समता संघातर्फे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या संजयनगर मुकुंदवाडी येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संघाचे संस्थापक अध्यक्ष श्रीरंग ससाणे, राज्य उपाध्यक्ष राजपाल सोदे, राज्य उपाध्यक्ष जगदेव मस्के, आरपीआयचे अरविंद अवसरमल, के. डी गायकवाड, सिद्धार्थ मुगदल उपस्थित होते.

* भीम शक्ती

भीम शक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेसअभिवादन करण्यात आले. संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष संतोष भिंगारे, जिल्हाध्यक्ष राजू मंजुले, सतीश नरवडे, शारदा निर्मल, रंजना कारके आदी उपस्थित होते.

डॉ. अण्णा भाऊ साठे सर्वपक्षीय जिल्हा जयंती उत्सव समितीचे वतीने अभिवादन सभा घेण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते अन्नदान करण्यात आले. आमदार प्रदीप जैस्वाल, समितीचे अध्यक्ष विश्वनाथ राजपूत, माजी नगरसेवक राजू अहिरे, स्वागत अध्यक्ष सुधाकर चांदण, किशोर तुपे, प्रदीप आव्हाड, अजय बोर्डे, शारदा घुले, संगीता सरोदे, संदीप चांदणे उपस्थित होते.

* शक्ती सदन

श्रीसाई सेवाभावी संस्था संचलित शक्ती सदन संस्थेत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यालय सहाय्यक योगिता बोराडे यांनी साठे यांच्या कार्याची माहिती दिली. सांस्कृतिक कार्यक्रम होऊन फळे वाटप करण्यात आली. कार्यक्रमास संस्थेतील लाभार्थी महिला, बालके तसेच संस्थेच्या अधीक्षिका आम्रपाली बोर्डे, महादेवी जाधव, विजय गांगे, योगेश कराड, वर्षा कोळी उपस्थित होते.



जिंतूर पाचलेगाव रोड वरील बांबूची रोपे रस्त्यावर फेकलेली दिसत आहे, ही रोप रोपवाटिकेची की कोणाच्या शेतातील स्कीम मधली आहे. चर्चेला उधाण आले आहे.

# संपादकीय

## जिद्द, चिकाटी अन् सुवर्णकन्या अस्मिता डे: त्रिपुराच्या लेकीची ऐतिहासिक गरुडझेप

अथांग जिद्द, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कोणत्याही संकटांवर मात करून यशाचे शिखर गाठता येते, हे त्रिपुराच्या २३ वर्षीय अस्मिता डे हिने पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे. ग्लासगो येथे सुरू असलेल्या 'राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६' (CWG 2026) मध्ये अस्मिताने ज्युडोच्या मॅटवर सुवर्ण कमाई करत भारताच्या क्रीडा इतिहासात आपले नाव सुवर्णअक्षरांनी कोरले आहे. राष्ट्रकुल खेळांच्या इतिहासात ज्युडो या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक पटकावणारी ती देशाची पहिलीच खेळाडू ठरली आहे. एका अत्यंत सामान्य कुटुंबातून आलेल्या अस्मिताचा हा सुवर्णप्रवास केवळ त्रिपुरासाठीच नव्हे, तर संपूर्ण भारतभरातील लाखो क्रीडापटूंसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. अस्मिताचा हा इथपर्यंतचा प्रवास अजिबात सोपा नव्हता. त्रिपुरातील बेलोनिया या छोट्याशा शहरातील एका सायकल दुरुस्ती करणाऱ्या मेकॅनिकची ही मुलगी. सुरुवातीला धावण्याची आवड असलेल्या अस्मितामधील खरी क्षमता तिथल्या स्थानिक प्रशिक्षकांनी ओळखली आणि तिला ज्युडो खेळण्याचा सल्ला दिला. हाच एक निर्णय तिच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. बेलोनिया विद्यापीठ कोचिंग सेंटर, त्रिपुरा स्पोर्ट्स स्कूल आणि त्यानंतर २०१८ मध्ये भोपाळच्या 'साई' (SAI) सेंटरमधील उच्च दर्जाचे प्रशिक्षण, या टप्प्यांवर अस्मिताने आपल्या कौशल्याला सातत्याने पैलू पाडले. तिची कौटुंबिक पार्श्वभूमी अत्यंत हलाखीची असली, तरी तिच्या स्वप्नांची भरारी मात्र गगनाला भिडणारी होती. आंतरराष्ट्रीय मंचावर अस्मिताने अल्पावधीतच आपले वर्चस्व प्रस्थापित केले. २०२२ ची आशियाई ज्युनिअर स्पर्धा, २०२३ चा मकाऊ ज्युनिअर आशिया कप आणि २०२५ ची कॅसाब्लांका आफ्रिकन ओपन स्पर्धा अशा एकामागून एक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सुवर्णपदके जिंकत तिने आपली क्षमता सिद्ध केली होती. मात्र, ग्लासगो येथील राष्ट्रकुल स्पर्धेत ४८ किलो वजनी गटातील अंतिम सामना तिच्या संयमाची आणि रणनीतीची खरी परीक्षा पाहणारा ठरला. कॅनडाच्या प्रबळ प्रतिस्पर्धी हायडी क्वाचविरुद्धच्या अटीतटीच्या सामन्यात सुरुवातीला गुणांनी मागे पडल्यानंतरही अस्मिताने धीर सोडला नाही. 'गोल्डन स्कोअर'च्या थरारक टप्प्यात तिने अचूक डावाचा वापर करत प्रतिस्पर्ध्याला चितपट केले आणि भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. सायकल दुरुस्तीच्या छोट्याशा दुकानापासून सुरू झालेला अस्मिताचा हा प्रवास आज जागतिक मंचावर भारताचा राष्ट्रध्वज तिरंगा पूर्ण अभिमानाने उंचावण्यापर्यंत पोहोचला आहे. वय अवघे २३ वर्षे असलेल्या या सुवर्णकन्येचे पुढील ध्येय आता ऑलिम्पिकच्या व्यासपीठावर भारताला पदक मिळवून देणे हे आहे. तिची ही ऐतिहासिक गरुडझेप देशातील तळागाळातील आणि ग्रामीण भागातील नवोदित खेळाडूंना विश्वासाचे नवे बळ देणारी ठरेल, यात शंका नाही.

# पॉक्सो प्रकरणात मदतीसाठी वीस हजारांची लाच

## पोलीस उपनिरीक्षक एसीबीच्या जाळ्यात

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा पोलीस ठाण्यातील एका पोलीस उपनिरीक्षकाला पॉक्सो (POCSO) प्रकरणात मदत करण्याच्या मोबदल्यात २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे. या कारवाईत एका खासगी व्यक्तीलाही ताब्यात घेण्यात आले असून या घटनेमुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील संशयित आरोपी पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत शिवाजी दवंगे (वय ५७, तारा निवास, साईनगर, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड) आणि खासगी व्यक्ती इब्राहिम करीम वाणी (वय २८, जामुनमाथा, भोरमाळ, ता. सुरगाणा) अशी संशयितांची नावे आहेत.

तक्रारदाराच्या मुलाविरुद्ध सुरगाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यात पॉक्सो कायद्याची कलमे वाढवून त्याला अटक करण्यात आली होती. त्यानंतर तो कारागृहात होता. पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत दवंगे यांनी १९ जून २०२६ रोजी तक्रारदारास पोलीस ठाण्यात बोलावून दिवसभर बसवून ठेवले. तक्रारदार व त्यांच्या पत्नीला गुन्ह्यात आरोपी करण्याची धमकी देत, आरोपी करायचे नसल्यास आणि या गुन्ह्यात मदत करण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच मागितली. तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली.

तडजोडीअंती २० हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य

या संदर्भात तक्रार प्राप्त झाल्यानंतर पंचांसमक्ष पडताळणी करण्यात आली. त्यावेळी उपनिरीक्षक दवंगे आणि तक्रारदार यांच्यात या संदर्भात चर्चा झाली. पंचांसमक्ष ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती २० हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य करण्यात आले. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा रचला. सुरुवातीच्या काही प्रयत्नांमध्ये आरोपी उपनिरीक्षकाने लाचेची रक्कम स्वीकारण्यास टाळाटाळ केली. म्हणजेच २१ आणि २४ जून रोजी तक्रारदारास लाचेची रक्कम देण्यासाठी पाठविण्यात आले. मात्र, उपनिरीक्षक दवंगे बाहेर असल्याने त्यांची भेट झाली नाही.

त्यानंतर ३० जून रोजी पंचांसह तक्रारदारास लाच देण्यासाठी पाठविण्यात आले असता, उपनिरीक्षक दवंगे यांनी लाचेची रक्कम स्वीकारण्यास टाळाटाळ केली.मात्र, अखेर त्यांनी तक्रारदाराला ही रक्कम सुरगाणा पोलीस ठाण्याजवळील एका किराणा दुकानात काम करणाऱ्या इब्राहिम वाणी याच्याकडे देण्यास सांगितले. तक्रारदाराने २० हजार रुपये दिल्यानंतर इब्राहिम वाणी याने ती रक्कम स्वीकारली आणि त्याच माध्यमातून पोलीस उपनिरीक्षक दवंगे यांच्यापर्यंत लाच पोहोचल्याची खात्री होताच एसीबीच्या पथकाने दोघांनाही रंगेहात ताब्यात घेतले.

# अन्य जिल्ह्यात कारवायांचा धडाका! मग परभणी जिल्ह्यावरच मेहरबानी का..?

## बनावट पनीर व गुटख्यांचा खुलेआम बाजार

हिंदू प्रकाश वार्ता/ अशोक पवार

**परभणी:-** तुकाराम मुंडे साहेबांचे अन्न व औषध प्रशासन विभागात आयुक्त म्हणून नियुक्ती झाली. अन काळ्या बाजारातील भेसळखोरांचे धावे दणाणले . तुकाराम मुंढे साहेबांनी अख्या महाराष्ट्रात कारवायाचा धडाका सुरू केला परभणी जिल्ह्यातील भेसळखोर व गुटखा माफिया यांच्यासाठी "अच्छे दिन" आले. संपूर्ण जिल्ह्यामध्ये खुलेआम बनावट खुले पनीर खवा दुधाची खुल्याम विक्री सुरू असून गल्लीबोळातील छोट्या छोट्या पानपट्ट्यावर बंदी असलेला गुटखा सर्रास विकली जात आहेत या वरील प्रकारामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याची उघड जीवघेणा खेळ सुरू आहे. याबाबतीत परभणीतील अन्न व औषध प्रशासन अधिकारी गाढ झोप येत आहेत का चेरी मेरी मध्ये दंग आहेत या सर्वांवर केव्हा कारवाई होणार असा संताप जनक सवाल परभणीच्या जनतेने विचारलाय.

परभणी शहर आणि जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये हलक्या दर्जाचे रासायनिक प्रक्रियेतून तयार केलेले निकृष्ट बनावट पनीर खुलेआम विक्री केली जात असून त्याचबरोबर बनावट मावा व खवा मोठ्या प्रमाणात बाहेरून विक्रीसाठी येत आहे सणवार असो रोजच्याच दैनंदिन जीवनामध्ये सर्वच मिठाईच्या दुकानांमध्ये भेसळयुक्त विषारी पदार्थांचा पुरवठा केला जात आहे हे दुग्धजन्य पदार्थ खाऊन सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे विभागाला या गोष्टीविषयी तसू भरही काही घेणेदेणे नाही एकीकडे राज्यांमध्ये गुटखाबंदीचा डंका वाजवत राहिला गुटखाबंदी कागदावरच राहिली की काय असा प्रश्न परभणी करांना पडला आहे शहरातील गल्लीबोळातून चौकापर्यंत चौकापासून शाळा कॉलेजापर्यंत पानपट्ट्यांवर विमल गोवा आर एम डी सारख्या बंदी असलेल्या प्राण घातक गुटखा सहज उपलब्ध होत आहे लहान बालकापासून तरुण वयापर्यंत तरुणांपासून म्हाताऱ्यापर्यंत गुटख्याच्या मोहपाशात ओढले जात आहेत पण अधिकारी कारवाईच्या नावाने चांगभलं म्हणण्याची वेळ आली आहे. परभणीतील एफडीए अधिकाऱ्यांचा नावापूर्ती पद असल्याची भूमिका बजावत आहेत एखादी लेचीपीची कारवाई करून कारवाई केल्याचा देखावा करायचा हात चोळीत गप्प बसायचे असाच कारभार परभणी जिल्ह्यात सुरू आहे व भेसळखोर पनीर मावा व खवा विक्रेते व माजूर गुटखा विक्रेते छाती काढून मोकाट फिरत आहेत सर्वसामान्य जनतेत असा सवाल उपस्थित होत आहे की जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासन चेरी मेरी तर दंग नाही ना दुसरीकडे मुंडे साहेबांनी भेसळखुरांची झोप उडवली तर इतर जिल्ह्यात भ्रष्ट अधिकारी आणि भेसळ माफिया चे धाबे बनवणारे धडक कारवाईचे सत्र तुकाराम मुंडे साहेबांनी सुरू केले आहे चाबूक कारवाई सुरू होणे अत्यंत गरजेचे असून तुकाराम मुंडे साहेबांनी स्वतः या प्रकरणी स्वतः लक्ष घालून धडक कार्यवाहीचा बडगाव उगारावा व भेसळ माफियाना पाठीशी घालणाऱ्या काम चुकार अधिकाऱ्यांचे पितळ उघडे करावे अशी मागणी परभणीकरांनी केली आहे

# पुढील चार दिवसांसाठी विजांचा कडकडाट आणि जोरदार पावसाचा वेधशाळेचा अंदाज

**मुंबई :** मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने राज्यासाठी पुढील चार दिवसांचा हवामानाचा अंदाज जाहीर केला असून, मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता लक्षात घेता विविध जिल्ह्यांसाठी अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागरिकांनी विजांचा कडकडाट आणि जोरदार पावसाच्या काळात आवश्यक ती खबरदारी घ्यावी, सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा तसेच स्थानिक प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने जारी केलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.प्रादेशिक हवामान केंद्राने रविवार २ ऑगस्ट २०२६ रोजी रायगड, पुणे घाट परिसर, सातारा घाट परिसर, रत्नागिरी, कोल्हापूर, अकोला, वाशिम, अमरावती, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता व्यक्त केली आहे.

तसेच सोमवार ३ ऑगस्ट २०२६ रोजी रत्नागिरी, सातारा घाट परिसर, बुलढाणा, अकोला, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट दिला आहे. तर मंगळवार ४ ऑगस्ट २०२६ रोजी बुलढाणा, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मेघगर्जना व विजांच्या कडकडाटाची शक्यता वर्तवली आहे. प्रादेशिक हवामान केंद्राने बुधवार ५ ऑगस्ट २०२६ रोजी बुलढाणा, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे.

# यंदाच्या गणेशोत्सवात पीओपी मूर्तींना परवानगी मिळण्याची शक्यता

**मुंबई :** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार राज्य सरकार शाडूच्या (मातीच्या) पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा मोठ्या प्रमाणावर प्रचार आणि प्रसार करणार आहे. मात्र, दुसरीकडे (PoP) म्हणजेच पीओपीच्या मूर्तींवर यंदाच्या वर्षी तातडीने पूर्ण बंदी घालण्यास सरकारने विरोध दर्शवला आहे. मुंबई उच्च न्यायालयात सुरू असलेल्या एका याचिकेदरम्यान सरकार आपली ही भूमिका मांडणार असल्याचे वृत्त आहे.

एका प्रसिद्ध इंग्रजी वृत्तपत्राच्या रिपोर्टनुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत शासनाची भूमिका निश्चित करण्यात आली. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (CPCB) मे २०२० मध्ये जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत पीओपी मूर्तींवर पूर्ण बंदी घालण्याची मागणी करणारी एक जनहित याचिका (PIL) न्यायालयात दाखल आहे. पीओपीच्या मूर्ती पाण्यात लवकर विरघळत नसल्याने जलप्रदूषण होते, असा युक्तिवाद या याचिकेत केला आहे. परंतु, राज्य सरकार कोर्टात स्पष्ट करणार आहे की, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे हे नियम केवळ 'सल्ला' (Advisory) म्हणून आहेत, ते कायदेशीररित्या बंधनकारक नाहीत. तसेच, पर्यावरणपूरक शाडूच्या मूर्तींना प्रोत्साहन दिले जात असले, तरी अचानक पीओपीवर बंदी आणल्यास हजारो मूर्तिकारांचे मोठे नुकसान होईल, असे सरकारचे म्हणणे आहे. यंदाचा गणेशोत्सव १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या काळात साजरा होणार आहे. या सणासाठी लागणाऱ्या बहुतांश पीओपी मूर्तींचे काम मूर्तिकारांनी आधीच पूर्ण केले आहे. अशा ऐनवेळी जर मूर्तींवर बंदी घातली, तर ती मूर्तिकारांसाठी आर्थिकदृष्ट्या अत्यंत घातक ठरेल आणि इतक्या कमी वेळात हा निर्णय लागू करणे व्यवहार्य नाही, असा मुद्दा सरकार न्यायालयात मांडणार आहे.

# सिद्धिविनायक मंदिरातून 18 कोटींची लूट, राज ठाकरेंचा आरोप न्यासाच्या अध्यक्षांनी फेटाळला

**मुंबई :** सिद्धिविनायक मंदिर न्यासाच्या दानपेटीतून दरवर्षी तब्बल १८ कोटी रुपयांची लुटालूट होत असल्याचा गंभीर आरोप मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केला आहे. न्यासाच्या विश्वस्तांनीच यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून चौकशीची मागणी केली असल्याचे सांगत, या प्रकरणाचे धागेदोरे वरिष्ठ पातळीपर्यंत पोहोचल्याचा दावाही त्यांनी केला. महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या २० व्या वर्धापनदिन मेळाव्यात ते बोलत होते. राज ठाकरेंचा आरोप श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाचे अध्यक्ष सदा सरवणकर यांनी फेटाळला आहे.

कार्यकर्त्यांना संबोधित करताना राज ठाकरे म्हणाले की, भाविक श्रद्धेने मंदिरात दान टाकतात, परंतु तिथेच कर्मचारी चोरी करताना पकडले गेले आहेत. कंत्राटी कर्मचाऱ्यांवर कारवाई होण्यापूर्वी दर बुधवारी दानपेटीची मोजदाद ५० लाखांच्या आत भरत होती. मात्र, कारवाईनंतर हीच रक्कम दीड कोटी रुपयांवर पोहोचली आहे. याचा अर्थ उर्वरित रक्कम लंपास केली जात होती आणि वर्षाला सुमारे १८ कोटी रुपयांचे नुकसान न्यासाचे होत होते. राहुल लोंढे, मीना कांबळी, गोपाळ दळवी आणि सुदर्शन सांगळे या विश्वस्तांनी स्वतः उपमुख्यमंत्र्यांना पत्र लिहून उच्चस्तरीय चौकशीची मागणी केल्याचे त्यांनी नमूद केले.

या वेळी राज ठाकरे यांनी केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांवरही टीका केली. नीट परीक्षेतील गोंधळ, शिक्षणावरील घटता खर्च आणि बेरोजगारीमुळे तरुण-तरुणींमध्ये तीव्र संताप असल्याचे त्यांनी सांगितले. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या वक्तव्याचा समाचार घेताना, त्यांना फिंगरप्रिंट आणि फूटप्रिंटमधील फरक कळत नसल्याची टीका त्यांनी केली.

तसेच रस्ते, पाणी, शिक्षण व आरोग्य या मूलभूत सुविधांअभावी तरुण देश सोडून जात असून, सरकारने या वास्तविक प्रश्नांकडे लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

सिद्धिविनायक मंदिरात आर्थिक गैरव्यवहार नाही

श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासामध्ये कोणताही आर्थिक गैरव्यवहार किंवा घोटाळा झालेला नाही, असा खुलासा न्यासाचे अध्यक्ष सदा सरवणकर यांनी केला आहे. काही विश्वस्तांनी सरकारला दिलेल्या पत्रामुळे नागरिकांमध्ये गैरसमज पसरला असून, मंदिर न्यासाचा कारभार अत्यंत पारदर्शक आणि उत्कृष्ट पद्धतीने सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, भाविकांकडून दर्शनासाठी ऑनलाईन माध्यमातून पैसे घेणाऱ्या ९ कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# शिवना येथे SIR विशेष मतदार यादी पुनरीक्षणासाठी फॉर्म भरण्याची मोफत सुविधा

## पंचायत समिती सदस्य सलीम भैय्यांचे नागरिकांना आवाहन



**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील शिवना येथे सध्या विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण (SIR) अभियान सुरू असून नागरिकांना आवश्यक अर्ज व कागदपत्रे भरण्यास कोणतीही अडचण येऊ नये यासाठी पंचायत समिती सदस्य शेख सलीम (सलीम भैया) यांच्या संपर्क कार्यालयात फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या माध्यमातून पात्र मतदारांना आवश्यक फॉर्म भरून देणे, कागदपत्रांची माहिती देणे तसेच मतदार यादीसंदर्भातील आवश्यक मार्गदर्शन केले जात आहे. मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, आवश्यक दुरुस्ती करणे किंवा इतर संबंधित प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पंचायत समिती सदस्य शेख सलीम (सलीम भैया) यांनी सांगितले की, लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक पात्र नागरिकाचे मतदार यादीत नाव असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे शिवना व परिसरातील सर्व नागरिकांनी वेळेत आवश्यक फॉर्म भरून प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच आवश्यक कागदपत्रांसह संपर्क कार्यालयात येऊन या मोफत सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

शिवना व परिसरातील सर्व नागरिकांनी या सुविधेची नोंद घेऊन विशेष मतदार यादी पुनरीक्षण (SIR) अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# भाजपा युवा मोर्चाच्या छत्रपती संभाजीनगर पूर्व जिल्हा उपाध्यक्षपदी अजिनाथ सोनवणे यांची नियुक्ती



**फुलंब्री, प्रतिनिधी :** भारतीय जनता युवा मोर्चाच्या छत्रपती संभाजीनगर पूर्व जिल्हा उपाध्यक्षपदी अजिनाथ सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे फुलंब्री तालुक्यासह पूर्व जिल्ह्यातील भाजयुमो कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पक्षाने दिलेल्या या महत्त्वपूर्ण जबाबदारीबद्दल अजिनाथ सोनवणे यांनी महामहीम राज्यपाल मा. हरिभाऊजी बागडे, माजी केंद्रीय मंत्री ,रावसाहेब पाटील दानवे, फुलंब्री विधानसभा मतदारसंघाच्या आमदार अनुराधाताई चव्हाण, विधान परिषदेचे आमदार सुहास शिरसाठ, जिल्हा परिषद उपाध्यक्ष जितेंद्र बाबा जयस्वाल, पंचायत समिती सभापती सर्जेराव पाटील मेटे, वडोद बाजार मंडळ अध्यक्ष गोपाल वाघ, फुलंब्री मंडळ अध्यक्ष सुचित बोरसे, पंचायत समिती सदस्य बाळासाहेब तांदळे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष ऋषी नरवडे, राजेंद्र पाटील डकले, कृष्णा पाटील सोनवणे यांच्यासह सर्व ज्येष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी अजिनाथ सोनवणे म्हणाले, "भारतीय जनता पक्षाने माझ्यावर दाखविलेला विश्वास ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. या विश्वासाला पात्र ठरत पक्षाची संघटना तळागाळापर्यंत अधिक मजबूत करण्यासाठी, युवकांना संघटित करण्यासाठी आणि जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी पूर्ण निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समर्पणाने कार्य करत राहीन."

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लहू प्रहार संघटनेतर्फे अभिवादन



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** लोकशाहीर, साहित्यरत्न तथा साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त लहू प्रहार संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजीनगरमधील बळीराम पाटील शाळेसमोरील लहुजी साळवे चौकात एकत्र येत त्यांना आदरांजली वाहण्यात आली.या अभिवादन कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. त्यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि वैचारिक योगदानाचे स्मरण करत उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा वसा पुढे चालवण्याचा संकल्प केला.

या कार्यक्रमात लहू प्रहार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संतोष शंकरराव पवार, राज्य कार्याध्यक्ष कचरू कांबळे आणि राज्य संघटक मच्छिंद्र बहिलम उपस्थित होते. तसेच आनंद लोखंडे, राजू अहिरे, समाधान, प्रकाश कांबळे, नारू कांबळे यांच्यासह संघटनेचे इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'गजर विठ्ठलाचा' कार्यक्रमात भक्तिरसाची अवीट मेजवानी

## विश्वजित संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या बहारदार सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी एकादशीनिमित्त विश्वजित संगीत विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'गजर विठ्ठलाचा' हा विद्यार्थी कलावंतांचा सांस्कृतिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात पार पडला. सिडको एन-७ येथील बजरंग चौकातील दुर्गा माता मंदिर परिसरात आयोजित या कार्यक्रमाला



नागरिक, संगीतप्रेमी, वारकरी व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विठ्ठल भक्तीपर गायन, अभंग, भजन, भारुड, तबला वादन, हार्मोनियम वादन, नृत्य तसेच विविध सांस्कृतिक कलांचे उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. भक्तिरसाने नटलेल्या या कार्यक्रमाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

विश्वजित संगीत विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष सचिन शिंदे व संचालिका यमुना शिंदे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन श्रद्धा देवचक्के यांनी केले.

यावेळी प्रा. रमेश धोंडगे, नायब तहसीलदार सुनंदा गायकवाड, किशन शिंदे आणि चंद्रकला शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी विश्वजित संगीत विद्यालयाच्या कार्याचे कौतुक केले.

# आज 14 वी 'मिसेस फूडराइट गेट गोइंग मान्सून मॅरेथॉन'; 1900 धावपटूंचा उत्साह

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महिलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याबाबत जनजागृती घडविणाऱ्या 'गेट गोइंग वुमन फॉर फन, फिटनेस अँड हेल्थ' संस्थेतर्फे आज (रविवार, २ ऑगस्ट) १४ वी 'मिसेस फूडराइट गेट गोइंग मान्सून मॅरेथॉन २०२६' उत्साहात आयोजित करण्यात आली आहे. 'रन फॉर हर' (आरोग्य, सक्षमीकरण आणि महिलांप्रती सन्मान) या संकल्पनेवर आधारित ही मॅरेथॉन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर तसेच पी. ई. एस. कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन स्टेडियम परिसरातून होणार असून, यामध्ये सुमारे १,९०० धावपटू सहभागी होत आहेत. विशेष म्हणजे, सहभागींपैकी ५० टक्क्यांहून अधिक महिला आहेत.

स्पर्धेत ३, ५ आणि १० किलोमीटर अशा तीन गटांचा समावेश असून, विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. मागील १५ वर्षांपासून 'गेट गोइंग' संस्था महिलांच्या आरोग्य, फिटनेस आणि साहसी उपक्रमांसाठी सातत्याने कार्यरत आहे. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी 'गेट गोइंग संडे' अंतर्गत धावणे, सायकलिंग, ट्रेकिंग, योगा आणि स्ट्रेंथ ट्रेनिंगसारखे उपक्रम राबवले जातात. शहरात मॅरेथॉन संस्कृती रुजविण्यात आणि आधुनिक टाइमिंग तंत्रज्ञानाचा वापर सुरू करण्यातही संस्थेचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

यंदाच्या स्पर्धेत घरकाम करणाऱ्या महिला, उदयनशालिनी फाउंडेशनच्या विद्यार्थिनी, 'साकार', 'ट्युलिप', विहंग आणि सावित्री फुले एकात्म महिला संघाच्या सदस्यांना विनामूल्य सहभाग देण्यात आला आहे. पूर्णपणे महिला कार्यकारिणीद्वारे आयोजित होणारी ही मॅरेथॉन शहरातील सर्वात वैशिष्ट्यपूर्ण क्रीडा उपक्रमांपैकी एक मानली जाते. डॉ. प्रिया देशमुख, डॉ. उमा महाजन यांच्यासह कार्यकारिणी सदस्यांनी स्पर्धेच्या यशासाठी विशेष परिश्रम घेतले आहेत.

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात अभिवादन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:**-लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यापीठाच्या सिम्पोजियम सभागृहात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार उपस्थित होते. त्यांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी कुलसचिव श्री. पुरभा काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात उपकुलसचिव (सामान्य प्रशासन) श्री. पद्माकर पाटील यांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनकार्याचा, साहित्यसंपदेचा तसेच सामाजिक परिवर्तन आणि राष्ट्रनिर्मितीतील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाचा परिचय उपस्थितांना करून दिला. समाजातील वंचित, शोषित आणि कष्टकरी घटकांच्या वेदना व संघर्षाला आपल्या साहित्याद्वारे प्रभावीपणे वाचा फोडणारे अण्णा भाऊ साठे यांचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी सहाय्यक कुलसचिव श्री. राम खोबे तसेच प्रशासकीय इमारतीतील विविध कार्यालयांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांना अभिवादन केले. कार्यक्रमात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य, लोकजागृती आणि समतामूलक समाजनिर्मितीसाठीच्या अमूल्य योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले

# घाटी रुग्णालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन




हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी प्रभारी अधिष्ठाता डॉ. एम. बी. लिंगायत यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास उपअधिष्ठाता डॉ. के. डी. गर्कल, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे, डॉ. अंजली शेटे, डॉ. बिना गढीया, डॉ. राधेय खेत्रे, डॉ. खाडिलकर, डॉ. देशमुख, डॉ. डोईफोडे, ग्रंथपाल डॉ. संतोष शेळके, डॉ. सलमान, डॉ. शुभदा पवार, राजेंद्र मोरे, मेट्रन संजीवनी गायकवाड, वरिष्ठ लिपिक मुराद बेग, सुजित खिल्लारे तसेच महाविद्यालय व रुग्णालयातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# श्री विठ्ठल मंदिरात टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात



**जिंतूर :** येथील श्री विठ्ठल मंदिरात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन व विचारप्रबोधन कार्यक्रम उत्साहात झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहुल देशमुख होते. प्रमुख उपस्थितीत नगरसेवक योगेश काशीकर, ह.भ.प. मारोती महाराज कोंडाळ यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रमुख वक्ते अ‍ॅड. योगेश उन्हाळे यांनी लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रभक्तीची प्रेरणा आणि अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक समतेच्या विचारांचे महत्त्व विशद केले. नगरसेवक योगेश काशीकर यांनी महापुरुषांचे विचार कृतीत उतरविण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात राहुल देशमुख यांनी महापुरुषांचे विचार समाजासाठी दीपस्तंभ असल्याचे सांगितले.

सूत्रसंचालन रणधीर शोभणे यांनी केले, तर शैलेश कोठेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती होती.

# लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त अभिवादन व गणवेश वाटप कार्यक्रम संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर:** शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, सिडको एन. ७ येथील संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूलच्या प्रांगणात एक अत्यंत भारलेला आणि उत्साही माहोल पाहायला मिळाला. बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीचे आणि बहुजनांच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीचे! या संयुक्त महोत्सवात अभिवादन सोहळ्यासोबतच विद्यार्थ्यांना शालेय गणवेशांचे वाटप करण्यात आले.




कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर जेव्हा विद्यार्थ्यांनी आपल्या चिमुकल्या आवाजात आणि तितक्याच भारदस्त विचारांतून टिळक व अण्णाभाऊंच्या कार्यावर प्रकाश टाकला, तेव्हा संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले. पायल मिसाळ, प्रेमराज चबुकस्वार, समरीन खान, पायल विश्वकर्मा, सोनल मोरे आणि सम्राट भांबळे या युवा वक्त्यांनी शिक्षणाचे महत्त्व, स्वाभिमान, सामाजिक समता आणि राष्ट्रप्रेम या विषयांवर अत्यंत प्रभावी मनोगते व्यक्त केली. त्यांच्या शब्दांमधील प्रखर राष्ट्रभक्ती पाहून उपस्थितांच्या अंगावर काटा आल्याशिवाय राहिला नाही.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश सोनवणे यांनी भूषवले, तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक संदिप प्रकाश सोनवणे आणि संस्थेच्या सचिव संगीताताई खिल्लारे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांना नवीन शालेय गणवेश वाटप करण्यात आले. गणवेश अंगावर चढवताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर जो आनंद आणि चमक झळकली, ती पाहण्यासारखी होती.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे संदिप प्रकाश सोनवणे म्हणाले, "लोकमान्य टिळकांनी जशी स्वराज्याची ज्योत पेटवली, तसेच अण्णाभाऊंनी आपल्या लेखणीतून वंचितांना हक्क मिळवून दिला. हा आजचा गणवेश म्हणजे केवळ कपडा नाही, तर तो सर्व विद्यार्थ्यांमध्ये समानता, शिस्त आणि आत्मविश्वास निर्माण करणारा महामंत्र आहे." प्रकाश सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचा सल्ला दिला. ते म्हणाले, "महान व्यक्तींच्या जयंती-पुण्यतिथी केवळ कागदावर साजरी करायच्या नसतात, तर त्यांचे विचार रक्तात भिनवायचे असतात. विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या दुनियेत हरवून न जाता, वाचन, अभ्यास आणि संस्कारांची शिदोरी घट्ट पकडून देशाचे सुजाण नागरिक बनावे. आमची संस्था अशाच संस्कारक्षम उपक्रमांसाठी नेहमीच कटिबद्ध आहे."

कार्यक्रमाचा डोलारा सांभाळताना सूत्रसंचालन ऋतुजा आलिंग हिने आपल्या भारदस्त आवाजात लिलया पार पाडले, तर आभार प्रदर्शन पायल मिसाळ हिने मानले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सुनील चौधरी, किरणकुमार सोनवणे, हर्षल पगारे, साहेबराव शिंदे, विजय पाटील, वैशाली बागुल आणि रत्नमाला घोरपडे तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक उपस्थिती होते.

# कै.बाबुरावजी काळे शाळेत लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१ ऑगस्ट :** कै.बाबुरावजी काळे शाळेत लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.सर्वप्रथम शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.त्यानंतर शाळेच्या २० हून अधिक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रा.निलेश पाटील होते.त्यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याचा आढावा मांडला.या महान विभूतींच्या जयंती आणि पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थ्यांनी काहीतरी बोध घेऊन आपल्या जीवनाची वाटचाल करावी असे त्यांनी स्पष्ट केले. या वेळी शाळेचे सहशिक्षक सागर पाटील,अरुणा घाटे, वैशाली खेडकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.इयत्ता ८ वीच्या विद्यार्थिनी कु.कश्मिरा पाटील,प्राची तायडे यांनी सूत्रसंचालन केले.या प्रसंगी प्रा.डॉ.दादासाहेब पवार, उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,पर्यवेक्षक सागर घाटे,प्रा. योगेश काळे,सहशिक्षिका मनिषा पाटील,सीता पगार,आशा गणगे,अंजली कथलकर,विद्या पाटील,शीतल जाधव, अरुणा भोई,रुपाली मानकर,रंजना जाधव,नलिनी पाटील, भाग्यश्री काळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ज्ञानेश्वर पंडित,संजय डापके,रमेश कंडारे, सुनीता जाधव,रुख्मिणी नेरपगार,लता गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

# भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था संस्थेची 28 वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

## पतसंस्था चालवणारे कर्मचारी व सभासद यांचे मोलाचे कार्य – चेअरमन प्रभाकर काळे

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१ ऑगस्ट :** सोयगाव येथील भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था मर्यादित सोयगाव यांची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१ शनिवार रोजी सोयगाव येथील मराठी नॅशनल शाळा येथे सकाळी १०.०० वाजता सभा सुरू करून पतसंस्थेचे जेष्ठ सभासद रवींद्र काळे,माजी संचालक संजय शहापूरकर,कृष्णा आप्पा कुर्लेकर,भास्कर चौधरी हस्ते भैरवनाथ महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सभेला सुरुवात करण्यात आली.यावेळी संस्थेचे सर्व सभासद,प्रमुख अतिथी उपस्थित होते.यावेळी संस्थेचे व्हाईट चेअरमन सतीश कोलते यांनी सभे पुढील येणारे विषय वाचून विषय मागील वार्षिक सर्वसाधारण सभेत चा वृत्तांत वाचून कायम करणे,सन.२०२५-२६ या वर्षाचे संचालक मंडळाने मंजूर केलेले आर्थिक पत्रके वाचून मंजूर करणे,सन.२०२५-२६ मध्ये अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे,सन.२०२५-२६ करिताचे संचालक मंडळांनी शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे,सन.२०२५-२६ करिता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाज पत्रकास मंजुरी






देणे,सन २०२५-२६ ऑडिट दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे,सन.२०२६-२७ करिता लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे बाबत,मे अध्यक्ष यांच्या पूर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे बाबत याबाबतचे सर्व वाचून सभासदांना माहिती दिली,संस्थेचे सभासद ज्येष्ठ मार्गदर्शक संजय शहापूरकर यांनी संस्थेला २८ वर्षे पूर्ण झाले त्यानिमित्ताने त्यांनी पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे व कर्मचारी यांना फुलगुच्छ देऊन सत्कार केला.तसेच पतसंस्थेच्या वतीने आलेले प्रमुख पाहुणे यांचे सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले समाजसेवक रवींद्र काळे,कृषी भूषण अरुण सोहनी,राजू दुतोंडे,भगवान वाघ,यांनी आपल्या भाषणेतून पतसंस्थेला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व काही सूचना ही पतसंस्थेला यावेळी दिल्या.तसेच संस्थेचे चेअरमन यांनी सभासदांना मार्गदर्शन करताना पतसंस्था मध्ये कर्मचारी व सभासद चांगले असले की पतसंस्थेला काही अडचण येत नाही व कर्मचारी व सभासदांनी असेच सहकार्य पतसंस्थेला कायम ठेवावे ही अपेक्षा व्यक्त पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे यांनी बोलताना केले.यावेळी ज्येष्ठ सभासद एकनाथ महाजन,शेख जावेद (बबलू भैय्या),समाजसेवक रवींद्र काळे,कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे व्हा.चेअरमन योगेश बोखारे,राजू एलीस,स्वामी समर्थ पतसंस्थेचे मॅनेजर बाळू बोरसे,तिरुपती अर्बनचे मॅनेजर विकास देसाई,कृषी भूषण अरुण सोहणी,नगरसेवक हर्षल काळे,संतोष बोडखे,गजानन कुडके,अमोल मापारी,दिपक पगारे,किशोर मापारी,शेख रशीद शेख भिकन,प्रकाश बोर्डे,समाजसेवक दत्तू रोकडे,बंडू कळवत्रे,भगवान वाघ,भागवत थोटे,रमेश गव्हाचे,संतोष भोई,आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.यावेळी पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे,व्हा. चेअरमन संतिष कोलते,संचालक नारायण घनघांव,मच्छिंद्र तेली,पांडुरंग बारी,कदीर शहा,मोतीराम पंडित,दामोधर निकम,निर्मलाबाई महाजन,सुवर्णा दुसाने,सुनिता औरंगे, व्यवस्थापक धनराज औरंगे,लिपिक विजय जावळे,शिपाई योगेश काळे,गोकूळ रोकडे,वसंत पठाडे,संध्या जगताप उपस्थित होते.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीष कोलते यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे यांनी केले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# 80 व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य: 'सेवापथ सोशल फाउंडेशन'तर्फे पर्यावरण जागृती सप्ताह व चित्रकला स्पर्धा संपन्न!



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारताच्या 80 व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून 'सेवापथ सोशल फाउंडेशन' या सामाजिक संस्थेच्या वतीने सध्या "पर्यावरण जागृती सप्ताह" मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. या उपक्रमांतर्गत जटवाडा रोडवरील एकता नगर येथील महानगरपालिका उर्दू शाळेत विशेष चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शाळेतील सर्वच वर्गांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अत्यंत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलेच्या माध्यमातून सुंदर व प्रगल्भ चित्रे साकारली.आज दिनांक 01 ऑगस्ट रोजी या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा पार पडला. यावेळी सेवापथ सोशल फाउंडेशनचे सन्माननीय सदस्य मयुर मोदे, शेख अब्दुल, शेख रहीम आणि संस्थेचे अध्यक्ष शेख अकबर यांच्या हस्ते सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पदक देऊन सन्मानित करण्यात आले. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच विद्यार्थ्यांना मिळालेल्या या प्रोत्साहनपर बक्षीसांमुळे विद्यार्थ्यांचा उत्साह ओसडून वाहत होता.

सदर स्पर्धा व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महानगरपालिका उर्दू शाळेच्या मुख्याध्यापिका नाजनीन परवीन पठाण यांचे विशेष सहकार्य व बहुमूल्य मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत शिस्तबद्ध वातावरणात हा पर्यावरण जनजागृतीपर कार्यक्रम संपन्न झाला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी प्रेम आणि जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास यावेळी संस्था पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे सभागृहासाठी 50 लाख देणार : शिरसाठ यांची घोषणा

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सर्वपक्षीय जिल्हा उत्सव समितीच्या वतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिवादन केले. बहुजन विकास मंत्री अतुल सावे आणि सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने सभागृह उभारण्यासाठी ५० लाख रुपये देण्याची घोषणा करून विनाविलंब सभागृह उभारण्याची ग्वाही पालकमंत्री शिरसाट यांनी दिली.

यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. अण्णा भाऊंनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक कार्यातून वंचित समाजाला नवी दिशा दिली असून, त्यांचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. याप्रसंगी खा. कल्याण काळे, माजी खा. चंद्रकांत खैरे, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, आ. विलास भुमरे, महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, उत्सव समितीचे अध्यक्ष अनिल मकरिये, सहायक पोलीस आयुक्त निर्मला परदेशी, माजी महापौर नंदकुमार घोडेले, त्र्यंबक तुपे आदी उपस्थित होते. प्रारंभी सर्वपक्षीय जिल्हा उत्सव समितीचे स्वागताध्यक्ष व निमंत्रक संजय ठोकळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

# सिडको पोलिसांची धडक कारवाई; चोरीच्या 28 मोटारसायकली जप्त, 4 जण जेरबंद

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी





**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील सिडको पोलीस ठाण्याच्या गुन्हे पथकाने एक मोठी कारवाई करत मोटारसायकल चोरी करणाऱ्या चार जणांच्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी ५० हून अधिक सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषकाच्या आधारे ही कारवाई केली असून, आरोपींकडून तब्बल ११ लाख २० हजार रुपये किमतीच्या २८ चोरीच्या मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत.

सिडको पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या काही दिवसांपासून मोटारसायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. या वाढत्या गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस उपायुक्त रत्नाकर नवले आणि सहाय्यक पोलीस आयुक्त मनोज पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल येरमे व त्यांच्या पथकाने विशेष मोहीम राबवली. तपासादरम्यान पोलिसांनी परिसरातील सुमारे ५० सीसीटीव्ही फुटेज तपासले तसेच गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे संशयितांचा माग काढला. या तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी प्रथम



योगेश कैलास गाडेकर याला ताब्यात घेतले. कसून चौकशी केली असता, त्याने आपल्या साथीदारांच्या मदतीने गाड्या चोरून त्या ग्रामीण भागात विक्रीसाठी ठेवल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी वेगाने चक्रे फिरवत त्याच्या इतर तीन साथीदारांनाही बेड्या ठोकल्या. या कारवाईत योगेश कैलास गाडेकर, कार्तिक गणेश पवार, सौरभ दिलीप वाघचौरे आणि राहुल कैलास बोरसे या चौघांना जेरबंद करण्यात आले आहे. पोलिसांनी या चौघांच्याही ताब्यातून टप्प्याटप्प्याने विविध कंपन्यांच्या एकूण २८ दुचाकी जप्त केल्या आहेत. या सर्व वाहनांची एकत्रित किंमत ११ लाख २० हजार रुपये इतकी आहे.

चारही आरोपींना न्यायालयात उपस्थित केले असता न्यायालयाने त्यांना १० दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या टोळीने आणखी किती गुन्हे केले आहेत आणि यात इतर कोणाचा सहभाग आहे का, या दृष्टीने पोलीस आता कसून चौकशी करत आहेत. दरम्यान, नागरिकांनी कोणतीही जुनी मोटारसायकल खरेदी करताना तिची कागदपत्रे, मालकी हक्क आणि वाहनाची संपूर्ण माहिती व्यवस्थित तपासूनच व्यवहार करावा, खात्री केल्याशिवाय जुने वाहन खरेदी केल्यास वाहन खरेदीदारावरही कायदेशीर कारवाई होऊ शकते, असे आवाहन सिडको पोलिसांनी केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराची जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी केली पाहणी

## नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा देण्याच्या सूचना; विविध आरोग्य योजनांचा घेतला आढावा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** सूर्या लॉन्स येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियानास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी भेट देऊन आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सेवा व सुविधांची पाहणी केली. यावेळी श्रीमती विद्या सानप, श्री. चंदन गणोरे आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. धानोरकर यांनी नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवा, औषधांचा पुरवठा, विविध तपासणी सुविधा तसेच राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेतला. शिबिरात येणाऱ्या प्रत्येक लाभार्थ्यास दर्जेदार, सुलभ आणि वेळेत आरोग्य सेवा मिळावी, तसेच शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवून त्यांना योजनांचा जास्तीत जास्त लाभ मिळावा, यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

महसूल समाधान शिबिरात आरोग्य विभागामार्फत बाह्यरुग्ण तपासणी, रक्तदाब व मधुमेह तपासणी, राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग (एनसीडी) तपासणी, दंत आरोग्य सेवा, मानसिक आरोग्य समुपदेशन, आरोग्य शिक्षण तसेच विविध शासकीय आरोग्य योजनांबाबत माहिती व मार्गदर्शन करण्यात आले. लाभार्थ्यांना आवश्यक औषधांचेही वितरण करण्यात आले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्ना भाले यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अमोल जयदयाल, डॉ. परमेश्वर वाकडकर, डॉ. जावेद कुरेशी, श्री. सुहास देशपांडे, श्रीमती आरती घाटकर, श्रीमती अनिता जाधव, श्रीमती शीतल बागुल, श्री. योगेश सोळुंके, श्री. लक्ष्मीकांत मालगे, श्री. विजेश जाधव तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र दौलताबाद व तिसगाव येथील आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना एकाच ठिकाणी विविध आरोग्य सेवा उपलब्ध करून देत शासनाच्या लोकाभिमुख आरोग्य योजनांचा प्रभावी लाभ देण्यात आला.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेत अभिवादन



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्राच्या सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक चळवळीतील अग्रणी व्यक्तिमत्त्व असलेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त शनिवारी जिल्हा परिषदेत अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

जिल्हा परिषदेच्या वेरूळ सभागृहात आयोजित कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष जितेंद्र जयस्वाल यांनी अध्यक्षीय समारोप करताना अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा समाजाने स्वीकार करून सामाजिक विषमता दूर करण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे, असे प्रतिपादन केले. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेच्या विचारांचा अण्णाभाऊ साठे यांनी आयुष्यभर पुरस्कार केला असून त्यांच्या साहित्य व कार्यकर्तृत्वातून सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा मिळते, असे सांगितले.

समाजकल्याण सभापती बालाजी सोनटक्के यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव करताना, "आहे रे" आणि "नाही रे" या वर्गांतील दरी जोपर्यंत संपत नाही, तोपर्यंत समाजात खरी समानता निर्माण होणार नाही, ही बाब अण्णाभाऊंनी ओळखली होती. त्यामुळे त्यांनी आपल्या साहित्य आणि शाहिरीच्या माध्यमातून आयुष्यभर समाजप्रबोधनाचे कार्य केले, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी समाजकल्याण विभागाचे विस्तार अधिकारी विजेंद्र डकले, देविदास बिरारे, बबन अरसुळ, प्रशांत पाटील, कल्पना ढाकणे, संजय वाघ, कल्याण ढोरकुले, जनार्दन चव्हाण, विनोद शेळके यांच्यासह जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संगीता साळुंके-गायकवाड यांनी केले.

## जिल्ह्यातील कुपोषित बालकांसाठी सचिन गरड यांची कौतुकास्पद कामगिरी

# जिल्हा परिषद सदस्य आणि स्थायी सभापती पदाचे मानधन सुपूर्द

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** पश्चिम विधानसभा मतदारसंघातील बजाजनगर - वडगाव कोल्हाटी परिसरातील भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष, माजी सरपंच आणि विद्यमान जिल्हा परिषद स्थायी समिती सभापती सचिन गरड पाटील यांनी महत्वाचा निर्णय घेतला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कुपोषित बालकांसाठी सचिन गरड यांनी पाच वर्षाचे जिल्हा परिषद सदस्य आणि स्थायी सभापती पदाचे मानधन सुपूर्द केले आहे. मला कुठल्याही प्रकारे भत्ता मानधन आणि देयके न देता, कुपोषित बालकांसाठी निधी खेचून वापरण्याचे आवाहन गरड यांनी सीईओ आणि प्रशासन यांना केले.

त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे आणि कौतुकास्पद कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. 2026-31 या पाच वर्षातील 60 महिन्याचे मानधन, स्थायी समिती सभा, सर्वसाधारण सभा भत्ता आणि इतर लाभाची रक्कम कुपोषित व गरजू मुलांना देण्याची विनंती त्यांनी केली.

मराठवाडा विभागाची राजधानी असलेल्या या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नागरिकांच्या आशीर्वादाने मिळालेल्या सर्व पदाचे भत्ते आम्ही नम्रपणे नाकारण्याचा निर्णय घेतला आहे. कुपोषित बालके व विद्यार्थी यांना आवश्यक साधने, खेळणी उपलब्ध व्हाव्यात, असे आवाहन प्रशासनाला यांनी केले. नागरिकांनी टाकलेल्या विश्वासाच्या ऋणातून उतराई होण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे. नागरिकांच्या विविध कररुपी निधीतून मिळणारे मानधन हे पुन्हा त्यांच्याच सेवेसाठी खर्च व्हावे, या भावनेतून हा निर्णय घेतला. ही केवळ जनसेवेसाठी मिळालेली जबाबदारी असून, यातून मिळणारे समाधान आमच्यासाठी अधिक मोलाचे असल्याचे भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष, माजी सरपंच आणि विद्यमान स्थायी समिती सभापती सचिन गरड पाटील यांनी सांगितले.

# विद्युत तारेची व पाण्याच्या मोटरी चोरी करणारे टोळीगजाआड

## दोन चोरटे जेरबंद चार गुन्ह्याची उकल. स्थानिक गुना शाखेची कारवाई

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी :-** शेतकऱ्याच्या विद्युत तारेची चोरी व पाण्याच्या मोटरीची चोरी करणाऱ्या टोळीला जेर बंद करण्यात पोलिसांना यश आले असून स्थानिक गुना शाखेच्या पथकाने केलेल्या या कारवाईत दोन चोरट्यांना ताब्यात घेतले असून चार गुन्ह्याची उकल करण्यात आली आहे. स्थानिक गुना शाखेचे पथक गस्त घालत असताना खबर्याद्वारे गुप्त माहिती मिळाली की शंकर काळे नैनाजी काळे दोन्ही राहणार मंगरूळ तालुका मानवत यांनी त्यांच्या सहकार्यासोबत मिळून मानवत शिवारातील ताड बोरगाव कोला रामपुरी इत्यादी ठिकाणी विद्युत पोल वरील अॅल्युमिनियमचे वायर तसेच मानवत पाथरी सोनपेठ या भागातून शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारी चोरी केल्याचे तार हे नयनाजी काळे यांच्या घरी ठेवलेले होती संबंधित दोघांना ताब्यात घेतले असून त्यांची चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे पोलिसांनी आरोपी जवळून 75 किलो ऍल्युमिनियम चे तार चोरीच्या सामान विक्रीतून मिळालेले 50 हजार रुपये रोख रखम या गुन्ह्यात वापरलेल्या ऑटो असा एकूण एक लाख 68 हजार 750 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपी ला पुढील कारवाईसाठी मानवत पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला असून ही कारवाई स्थानिक गुना शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश सावंतकर पोलीस अंमलदार विलास सातपुते महेश कोठाळे राहुल परसोडे माणिक वाघ सूर्यकांत फड सचिन भदर्गे विष्णू चव्हाण मधुकर ढवळे शरद सावंत महारुद्र सपकाळ यांच्या विशेष पथकाने केली .

# एमजीएममध्ये राष्ट्रीय प्राकृत भाषा परिषद संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या भारतीय तथा विदेशी भाषा संस्था आणि केंद्रीय संस्कृत विद्यापीठ, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने वीरशासन जयंतीनिमित्त आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय प्राकृत भाषा परिषदेचा समारोप एमजीएमच्या आईनस्टाईन सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात झाला. 'लोकभाषा प्राकृत - भारतीय विचार-परंपरा आणि सांस्कृतिक वारशाचा ठेवा' या विषयावरील परिषदेला देशभरातील संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि प्राकृत भाषा अभ्यासकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

समारोपप्रसंगी श्री लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाचे प्रा. डॉ. वीरसागर जैन, केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे प्रा. डॉ. श्रीयंश कुमार सिंघाई, प्रा. संजय मोहोड, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, संचालक डॉ. के. पी. सिंह यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

डॉ. वीरसागर जैन यांनी एमजीएममधील परिषद ही आपल्या स्मरणात राहणारी असल्याचे सांगत प्राकृत भाषेचा पर्यावरण, संगीत आणि मानसशास्त्राशी असलेला संबंध अधोरेखित केला. ज्ञानाला प्रोत्साहन दिल्यास ते अधिक समृद्ध होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

प्रा. डॉ. श्रीयंश कुमार सिंघाई यांनी प्राकृत साहित्य मानवी मूल्ये, आत्मचिंतन आणि जीवनदृष्टी समृद्ध करणारे असल्याचे सांगत या भाषेकडे झालेल्या दुर्लक्षाबद्दल खंत व्यक्त केली. अध्यक्षीय समारोपात डॉ. रेखा शेळके यांनी दोन दिवसांच्या परिषदेत प्राकृत भाषा, साहित्य, इतिहास, तत्त्वज्ञान आणि विज्ञान या विषयांवर सखोल चर्चा झाल्याचे सांगितले. परिषदेत सादर झालेले संशोधन निबंध प्राकृत भाषा व साहित्याच्या अभ्यासाला नवी दिशा देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# एरोबिक्स जिम्नॅस्टिक्स एशियन चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी संघ फिलिपाईन्सला रवाना

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** ४ ते ० ऑगस्ट दरम्यान तगायते(फिलिपाईन्स) येथे एरोबिक्स जिम्नॅस्टिक्स एशियन चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे आयोजन फेडरेशन इंटरनॅशनल दी जिम्नॅस्टिक्स तसेच जिम्नॅस्टिक्स असोसिएशन ऑफ द फिलिपाईन्स यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.यात वरिष्ठ गटामध्ये स्मित शहा,मानसी देशमुख,श्रीपाद हराळ,आर्य शहा,रामदेव बिराजदार,उदय मधेकर,अद्वैत वझे,संदेश चिंतलवाड,अभय उंटवाल, विश्वेश जोशी,पार्थेश मार्गपवार,सायली वझरकर,राधा सोनी,कार्तिकी हेगडे,श्रेया लोंढे,संकेत चिंतलवाड,तनिष रोजेगावकर, गौरी खलाणे, विश्वेश पाठक, अनिकेत चौधरी,गौरी ब्राह्मणे, मुग्धा बावस्कर ,

कनिष्ठ गटात मध्ये ओम सोनी, जान्हवी रोंघे, रिधीमा आव्हाड यांची निवड भारतीय संघात झाली आहे.मणिपूर येथे ७ जून रोजी राष्ट्रीय एरोबिक जिम्नॅस्टिक्स निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते त्यातून भारताचा संघ निवडण्यात आला .या निवड चाचणी मध्ये महाराष्ट्रातील २५ खेळाडूंची निवड भारतीय संघात झाली . तसेच १ ते ३१ जुलै दरम्यान मराठवाडा सांस्कृतिक मंडळ येथे राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते.या स्पर्धेसाठी प्रा. डॉ.मकरंद जोशी तांत्रिक समिती सदस्य पंच म्हणून सिद्धार्थ कदम , प्रशिक्षक रोहित रोंघे,राहुल श्रीरामवार,हर्षल मोगरे संघ प्रमुख म्हणून इंद्रजीतसिंग राठोड यांची निवड करण्यात आली आहे.भारतीय संघ स्पर्धेकरिता ०२ ऑगस्टला मुंबई येथून रवाना होणार आहे.

जिम्नॅस्टिक्स फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष सुधीर मित्तल,महाराष्ट्र हौशी जिम्नॅस्टिक्स संघटनेचे अध्यक्ष श्री.संजय शेटे, साई केंद्राच्या उपसंचालक डॉ.मोनिका घुगे, क्रीडा उपसंचालक शेखर पाटील,मसांमचे अध्यक्ष राम पातूरकर, सचिव हेमंत पातूरकर, जिल्हा संघटनेचे कार्याध्यक्ष ॲड.संकर्षण जोशी, अध्यक्ष डॉ.आदित्य जोशी,उपाध्यक्ष डॉ.रणजीत पवार सचिव श्री. हर्षल मोगरे, कोषाध्यक्ष श्री. रोहन श्रीरामवार,डॉ.विशाल देशपांडे,डॉ.सागर कुलकर्णी, महेश सोनी,अमेय जोशी,संदीप गायकवाड, राहुल तांदळे, शत्रुंजय कोटे,भारतीय क्रीडा प्राधिकरण पश्चिम विभाग जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षक संजय मोरे,सौ.तनुजा गाढवे स्पर्धेसाठी भारतीय संघाला शुभेच्छा दिल्या आहेत.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911